# दि विटा मर्चंटस् को-ऑप. बँक लि., विटा (जि. सांगली)

**प्रधान कार्यालय - साळशिंगे रोड, यशवंतनगर, विटा ४१५ ३११**
**फोन नं. (०२३४७) २७३३१३/१४ ७५८८५६४७९१**

## केवायसी/रिकेवायसी – खाते व्यवहारांबाबत जाहीर सूचना

**अ) रि.के.वाय.सी. - पुनर्पूर्तता करणेबाबत -** रिझर्व्ह बँकेच्या निर्देशानुसार, खात्यांच्या जोखीम वर्गीकरणानुसार बँकेच्या सर्व खातेदारांनी रि.के.वाय.सी. अर्थात ओळख व पत्ता पुरावा बँकेत पुन्हा सादर करणे आवश्यक आहे. यासाठी त्वरित ग्राहकांनी शाखेस संपर्क साधून पूर्तता करुन घ्यावी. ओळख व पत्ता पुराव्यामध्ये कोणताही बदल नसलेस तसे डिक्लरेशन देवून पूर्तता करावी. रि.के.वाय.सी. करुन न दिलेस ग्राहकांना खातेवर व्यवहार करता येणार नाहीत. त्याची सर्वस्वी जबाबदारी खातेदारांची राहील.

**ब) बचत, चालू खात्यांवर नियमित व्यवहार करणेबाबत व किमान शिल्लक रक्कम ठेवणेबाबत –**ज्या खातेदारांनी खात्यावर मागील दोन वर्षात व्यवहार केले नाहीत, त्यांनी शाखेत संपर्क करुन, के. वाय. सी. ची कागदपत्रे पुन्हा सादर करुन खात्यावर व्यवहार सुरु करावेत. नियमांनुसार खातेवर किमान शिल्लक ठेवणे आवश्यक आहे.

**क) रिझर्व्ह बँकेच्या DEAF फंडाकडे वर्ग झालेल्या ठेवीबाबत** - मागील दहा वर्षाहून अधिक काळ व्यवहार नसलेल्या ठेव खात्यांवरील रक्कमा रिझर्व्ह बँकेच्या DEAF फंडाकडे वर्ग केल्या जातात. DEAF फंडाकडे वर्ग केलेल्या ठेवींची माहिती बँकेच्या www.vitamerchantsbank.com या वेबसाईटवर उपलब्ध असून खातेदारांनी / वारसांनी याची माहिती घेऊन शाखेस संपर्क साधून रक्कमा परत घ्याव्यात.

**ड) लॉकर्स –** ज्या लॉकरधारकांनी एक वर्षाहून अधिक काळ आपले लॉकर ऑपरेट केलेले नाहीत, त्यांनी शाखेस संपर्क करुन आपले लॉकर ऑपरेट करावेत. तसेच रिझर्व्ह बँकेच्या सुचनेनुसार नवीन लॉकर अॅग्रीमेंटची पूर्तता करुन घ्यावी.

**इ) SMS Alerts** - बँक ग्राहकांना त्यांच्या सर्व व्यवहारांचे SMS त्यांचे मोबाईलवर पाठविणेची सुविधा देत असलेमुळे, खातेदारांनी कृपया शाखेस संपर्क करुन आपला अद्यावत मोबाईल नंबर आपले खात्यासाठी रजिस्टर व अपलोड करावा.

**ई) पॉझिटीव्ह पे सिस्टीम –** बँकांकडे पॉझिटीव्ह पे सिस्टीम सुरु झालेने खातेदारांनी रु. ५.०० लाखांवरील चेक्स काढलेस संबंधित शाखेस संपर्क करुन PPS Forms भरुन द्यावेत, अन्यथा क्लिअरींगमधून पास न झालेस त्याची जबाबदारी बँकेची असणार नाही, याची नोंद घ्यावी.

विविध प्रकारच्या सेवांबद्दल आकारणेत येणाऱ्या चार्जेसची माहिती वरील वेबसाईटवर उपलब्ध आहे. तरी खातेदारांनी वरील नमुद रि.के.वाय.सी., खातेवर नियमित व्यवहार, किमान शिल्लक, लॉकर ऑपरेशन्स, मोबाईल नंबर रजिस्ट्रेशन व अपडेशन्स इ. सुचनांबाबतची पूर्तता करणेसाठी बँकेस सहकार्य करावे, ही विनंती.

दिनांक : १८/०७/२०२५

**मुख्य कार्यकारी अधिकारी**